भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# –: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :–

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक १६.१०.२०१९ ते २.१०.२०१९)

| अंक ८३/२०१९ | दिनांक १५.१०.२०१९ | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (०९/०९/२०१९ ते १५/१०/२०१९ पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता १६/१०/२०१९ ते २०/१०/२०१९ पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०९/१० | १०/१० | ११/१० | १२/१० | १३/१० | १४/१० | १५/१० | दिनांक | १६/१० | १७/१० | १८/१० | १९/१० | २०/१० |
| ५.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | १५ | १२ | १३ | १८ | १८ |
| ३५.० | ३५.० | ३४.५ | ३५.० | ३५.० | ३६.० | ३६.० | कमाल तापमान (अं. से) | ३६ | ३६ | ३६ | ३३ | ३२ |
| २३.० | २३.० | २३.० | २३.० | २३.० | २३.० | २३.० | किमान तापमान (अं. से) | २६ | २६ | २५ | २४ | २४ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | सकाळ — मेघाच्छादन (ऑक्टा.) | ७ | ७ | ८ | ८ | ८ |
| ढगाळ | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | ढगाळ | दुपार | | | | | |
| ९२ | ९० | ९० | ९२ | ९२ | ९२ | ८५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८२ | ८७ | ८७ | ९२ | ९१ |
| ५७ | ६२ | ५५ | ५७ | ५७ | ५८ | ५३ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५६ | ६० | ६० | ७८ | ७६ |
| ०.७ | ०.३ | १.३ | ०.९ | १.३ | ०.६ | ०.८ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ०१० | ००८ | ००७ | ००६ | ००७ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ — वा-याची दिशा | पुर्वे कडून | पुर्वे कडून | पुर्वे कडून | पुर्वे कडून | पुर्वे कडून |
| आग्नेये | दक्षिणे | स्थिर | आग्नेये | दक्षिणे | पश्चिमे | ईशान्ये | दुपार | | | | | |

| मागील वर्षातील (२०१८) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ३२६९.२ | ४२५८.२ | ४२५८.२ | ५.० |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या ५ दिवसात जिल्ह्यात मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता असुन वातावरण ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | काढणी | भात कापणीसाठी विद्यापीठाने विकसीत केलेल्या “वैभव विळ्याचा” वापर करावा जेणेकरुन भात जमिनीलगत कापले जाईल.<br>जिल्ह्यात काही ठिकाणी हळव्या जातीच्या भात पिकांची कापणी करण्यात आली असून कापलेल्या भाताच्या पेंड्या झाकुन ठेवण्यात याव्यात व ज्यांना कापणी करावयाची आहे त्यांनी पाऊसाचा अंदाज पाहून कापणी करावी.<br>गरव्या जातीच्या भातासाठी बाहेरुन पाण्याची व्यवस्था करावी.<br>गरव्या जातींच्या भात पिकातील दाणे भरेपर्यंत पाण्याची पातळी ५ सेमी ठेवावी. त्यानंतर कापणीपुर्वी ८ ते १० दिवस शेतातील पाणी काढावे. कापणीसाठी तयार झालेल्या भातावर कोणतीही फवारणी करु नयेत. |
| कुळीथ व चवळी | पेरणी | कुळीथाची व रब्बी हंगामातील चवळी पिकाची पेरणी १५ ऑक्टोबर ते नोव्हेंबर अखेर पर्यंत करावी.<br>पेरणीसाठी दापोली - १ व कोकण सदाबहार, कोकण सफेद या अनुक्रमे कुळीथ व चवळी या पिकाच्या सुधारीत जातींचा वापर करावा.<br>कुळीथ व चवळी पिकाची पेरणी ३०x१५ सेमी या अंतरावर करावी. साधारणतः कुळीथासाठी प्रती हेक्टरी १८ ते २० किलो व चवळीसाठी प्रती हेक्टरी १५ ते १८ किलो बियाणे पुरते, बियाण्यास प्रती किलोस २.५ ग्रम थायरम या बुरशीनाशकाची व नंतर २५ ग्रम रायझोबीयम या जीवाणु संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी. कुळीथासाठी २५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि ६० किलो पालाश व चवळीसाठी २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरद या अन्नद्रव्याची मात्रा ओळीत सरीमध्ये बुजवुन द्यावी. |
| कडवा वाल | पेरणी | पिकाची पेरणी ऑक्टोबर व नोव्हेंबर मध्ये ३०x१५ सेमी किंवा ३०x२० सेमी किंवा ३०x३० सेमी या अंतरावर नांगरा पाठोपाठ करावी.<br>पेरणीसाठी पिकाच्या कोकण वाल -१ व कोकण वाल -२ या सुधारीत जातींचा वापर करावा.<br>पाभरीणे पेरणी केल्यास साधारणतः प्रती हेक्टरी ५० ते ६० किलो बियाणे पुरते. बियाण्यास प्रती किलोस ३.० ग्रम थायरम या बुरशीनाशकाची व नंतर २५ ग्रम रायझोबीयम या जीवाणु संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी.<br>पिकास ५० किलो स्फुरद या अन्नद्रव्याची मात्रा ओळीत बियाण्याखाली साधारण ५ सेमी खोलीवर द्यावी. |
| आंबा | पालवी | आंब्यामध्ये नविन पालवी आली असल्यास त्या पालवीचे तुडतुडे, शेंडा पोखरणारी अळी, पाने पोखरणारी अळी आणि मिजमाशीपासून आवश्यकतेनुसार संरक्षण करावे. त्यासाठी २५% प्रवाही डायमिथोएट किंवा ३६% प्रवाही मोनोक्रोटोफॉस ११ मिलि प्रति १० लि पाण्यात मिसळुन फवारणी करावी. |
| काजु | पालवी पुर्व | काजुवर खोडकिडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी.लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. काजुमध्ये जुन्या व रोगट फांद्या कापल्यानंतर त्या ठीकाणी १% बोर्डोमिश्रन लावावे. |
| नारळ, सुपारी | फुलोरा | विद्यापिठाने शिफारस केल्याप्रमाणे नारळाला खताचा दुसरा हप्ता ७५० ग्र. युरिया ६६० ग्र. म्युरेट ऑफ पोटॅश प्रति माड या प्रमाणात द्यावा. खते द्यावयाच्या वेळी जमिनीत पुरेसा ओलावा असेल याची खात्री करावी. |
| दुभती जनावरे, शेळ्या व कुक्कुटपालन | - | जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ कोमट पाणी व खाण्यासाठी हिरव्या ओल्या चा-याची व्यवस्था करावी.<br>पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनाखाली गाई व म्हशींना पायलाग रोग प्रतिबंधक लसीकरण करुन घ्यावे.<br>पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनाखाली शेळ्यांना पी.पी.आर (माथा) रोग प्रतिबंधक लसीकरण करुन घ्यावे. कोंबड्यांचे उन्हापासून संरक्षण करावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील “ग्रामीण कृषि मौसम सेवा” योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर
सहयोगी अधिष्ठाता
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर
नोडल ओफिसर
(ग्रामिण कृषि मौसम सेवा)
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
(०२३६२-२४४२३१)

डॉ. यशवंत चं. मुठाळ
तांत्रिक अधिकारी
ग्रामिण कृषि मौसम सेवा
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
(०२३६२-२४४२३१)